**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** दिनांक - ०५/०८/२०२४

**मुंबईचे गोवंडी व गोरेगांव परिसरात छापे टाकत एकूण २१३० नायट्रावेट टॅबलेट व एकूण २३ किलो वजनाचा गांजा या अंमली पदार्थासह रोख रक्कम रूपये ६ लाख जप्त.**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र. क्र. व कलम** | १) गु.र.क्र.४८/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ **(घाटकोपर युनिट)**<br>२) गु.र.क्र.४९/२०२४, कलम ८ (क) सह २० (क) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(कांदिवली युनिट)** |
| **दाखल दिनांक** | दिनांक ०५/०८/२०२४, व २६/०७/२०२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) गोवंडी, मुंबई<br>२) गोरेगांव, मुंबई |
| **आरोपी संख्या** | एकूण ०२ आरोपी. (०१ महिला आरोपी) |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण २१३० नायट्रावेट टॅबलेट अं.किं. रूपये ३,४७,१००/- सह रोख रक्कम ६ लाख.<br>२) एकुण २३ किलो वजनाचा गांजा अं.किं. रूपये ५,७२,५०० /-<br>**असा एकूण अंदाजे २३ किलो गांजा व २१३० टॅबलेट किं.अं. रूपये ९.१९ लाख रूपये किंमतीचे अंमली पदार्थासह रोख रक्कम ६ लाख जप्त.** |

**(१) गोवंडी परिसरातून २१३० नायट्रावेट टॅबलेटसह ६ लाख रोख रक्कम जप्त -**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे घाटकोपर युनिटने दिनांक ०५/०९/२०२४ रोजी गोवंडी, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे नायट्रावेट टॅबलेटची विक्री करणाऱ्या महिलेस ताब्यात घेतले. तिचे ताब्यातून एकूण २१३० नायट्रावेट टॅबलेट किंमत अंदाजे रूपये ३,४७,१००/- रूपये किंमतीचे अंमली पदार्थासह ६ लाख रूपये रोख रक्कम मिळून आल्याने, तिचेविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. नमूद गुन्हयाचा पुढील तपास घाटकोपर युनिट करत आहे.

**(२) गोरेगाव परिसरातून २३ किलो वजनाचा गांजा जप्त -**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे कांदिवली युनिटने दिनांक ०५/०९/२०२४ रोजी गोरेगांव, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे विक्री करीता आणलेला गांजा हा अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या एका तस्करांस ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातून एकूण २३ किलो वजनाचा गांजा किंमत एकूण ५.७२ लाख रूपये किंमतीचा अंमली पदार्थ मिळून आल्याने, नमूद इसमांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास कांदिवली युनिट करत आहे.

तसेच अंमली पदार्थ विरूध्द तक्रारींबाबत नागरिकांना तत्पर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व विनाविलंब दखल घेण्यासाठी केंद्र सरकारने **१९३३ हा टोल फ्री कमांक (हेल्पलाईन क्रमांक)** चालू केला आहे. १९३३ या टोल फ्री क्रमांकांची सेवा २४ तास चालू असणार आहे. १९३३ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून अंमली पदार्थ विरोधी तक्रार करता येईल. तक्रार करणाऱ्याचे नाव गोपनिय ठेवले जाणार आहे. याचा सर्वसामान्य जनतेला फायदा होणार असून, ते मोबाईलवरून तक्रार करू शकणार आहेत. या व्यतिरिक्त मुंबई शहरामध्ये १०० या क्रमांकावर व अंमली पदार्थ विरोधी विभागाकडील ९८१९१११२२२ या क्रमांकावर देखील २४ तासांत केव्हाही तक्रार करता येईल.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि. कक्ष, गुन्हे शाखा, घाटकोपर युनिटचे प्रभारी पो.नि. श्री. भगवान बेले, कांदिवली युनिटचे प्रभारी पो.नि. श्री.वैभव धुमाळ यांचे नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

------oooo------